## विक्रमगड, जव्हार, मोखाड्याला १५ कोटी

**जव्हार, दि.१६। प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विक्रमगड, जव्हार व मोखाडा नगरपालिका क्षेत्रातील मूलभूत व प्राथमिक सोयीसुविधा पुरविण्यासाठी विक्रमगड विधानसभा आमदार सुनिल भुसारा यांच्या मतदारसंघात १५ कोटींचा निधी मंजूर केला आहे. यातील विक्रमगड आणि मोखाडा या नव्याने झालेल्या नगरपंचायती असल्याने या क्षेत्रातील विकासकामांत या निधीचा फायदा होणार आहे. याशिवाय भुसारा यांनी सादर केलेल्या विकासकामांना तांत्रिक मंजुरी व जिल्हाधिकारी यांचे शिफारसपत्र जोडून निधी वितरणासाठी नगरविकास विभागास प्रस्ताव सादर करावा, असे पत्र सहसचिव नंदकुमार काटकर यांनी दिले आहे.

विक्रमगड विधानसभेत मोखाडा, जव्हार, विक्रमगड या नगरपंचायती येत असून या नगरपंचायत क्षेत्रात आजही मूलभूत गरजांसाठी अनेक नागरिकांना झगडावे लागत आहे. यामुळे या नगरपंचायती सक्षम व्हाव्यात, यासाठी आमदार भुसारा यांनी निधीची मागणी केली होती. याला दाद देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी १५ कोटींचा निधी तात्काळ दिल्याने येथील विकासकामांची वाट मोकळी झाली आहे.

सार्वजनिक शौचालये, कचराकुंड्या, पिण्याचे शुद्ध पाणी, ज्येष्ठ नागरिकांना खुल्या व्यायामशाळा, बगीचा अशा सर्व सोयी नगरपंचायत क्षेत्रात असाव्यात, अशी सर्व सामान्यांची मागणी होती, मात्र नगरपंचायतीना पुरेसा निधी नसल्याने याबाबत अडचण निर्माण होत होती. याचीच दखल घेऊन या क्षेत्रासाठी हा निधी आमदारांच्या प्रयत्नातून मिळाल्याने खऱ्या अर्थाने आता या भागाचा विकास होण्यास सुरुवात होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यात विदेशातुन आलेले ४५ प्रवाशी निरीक्षणाखाली

### ५ संशयिताचे नमुने तपासणीसाठी मुंबईला पाठविले

**पालघर, दि.१६। प्रतिनिधी**

वाडा येथील संशयिताचे नमुने निगेटिव्ह आले आहे. आज ५ संशयिताचे घशातील नमुने मुंबई येथील कस्तुरबा गांधी रूग्णालयात पाठविण्यात आले आहे,त्यांचा अहवाल लवकरच प्राप्त होईल असे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले

विविध देशातून प्रवास करून आलेले ४५ प्रवासी निरीक्षणाखाली ठेवण्यात आले होते त्यापैकी १९ प्रवाशांचा निरक्षण कालावधी संपला असून त्यांना कुठला हि कोरोना सदृश्य लक्षणे दिसून आलेले नाहीत



कोरुना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जिल्ह्यातील महानगरपालिका सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सरकारी व खाजगी शाळा, अंगणवाडी आणि महाविद्यालय व आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, यात्रा, जत्रा, दिंडी, पदयात्रा कीर्तन, भंडारा, सार्वजनिक सप्ताहा नागरिकांची गर्दी जमेल असे कार्यक्रम साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये ३१ मार्च पर्यंत बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच जिल्ह्यातील सामाजिक सांस्कृतिक राजकीय धार्मिक क्रीडाविषयक कार्यक्रमांना पुढील आदेश होईपर्यंत परवानगी देण्यात येणार नाही अशा कार्यक्रमांना यापूर्वी परवानगी दिली असल्यास सदर परवानगी रद्द करण्यात आल्या आहेत. ज्या ठिकाणी नागरिकांची गर्दी होणारे कौटुंबिक खाजगी कार्यक्रम, लग्न समारंभ जिल्ह्यातील जनतेने आपली सामाजिक जबाबदारी समजून पुढे ढकलावे असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे आहे.

आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधित संस्था प्रमुखांना देण्यात आल्या आहेत जिल्ह्यातील दहावी व बारावीच्या परीक्षा तसेच विद्यापीठाच्या परीक्षा या वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येणार आहेतअसेही जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले

जनतेमध्ये भीतीयुक्त वातावरण तयार होऊ नये म्हणून व्यापक प्रचार, प्रसिध्दी, जनजागृती केली जात आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जागृती केली जात आहे. शहरात वेगवेगळ्या ठिकाणी आजारासंबंधी प्रबोधनपर फलक, होर्डीग लावण्यात आले आहेत. , केबल नेटवर्कद्वारे माहिती दिली जात आहे. बसस्थानक, रेल्वेस्टेशन, मॉल्स, हॉटेल्स, बँक, एटीएम आदी ठिकाणे वारंवार निर्जंतुकीकरण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. सद्यस्थितीत शहर-जिल्ह्यात 'करोना'चा एकही रुग्ण नाही. तरीही खबरदारी म्हणून गर्दी होईल अशा सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करू नये. कौटुंबिक कार्यक्रमांनाही सार्वजनिक रुप आणू नका, तसेच मंदिर अथवा देवस्थानाला जाताना योग्य ती काळजी घ्या' घाबरू नका पण सतर्क रहा. कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. शिंदे यांनी केल आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी स्वयं स्वयंस्फूर्तीने कोरोना सदृश्य लक्षणे असल्यास नजीकच्या रुग्णालय मध्ये जाऊन आपल्या आरोग्याची तपासणी करावी तसेच कोरोना सदृश्य लक्षणे असलेली व्यक्ती आपल्याला आढळल्यास राष्ट्रीय कॉल सेंटर क्रमांक +९१-११-२३९७८०८६, राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्रमांक ०२०-२६१२७३९४, टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक १०४, पालघर जिल्हा नियंत्रण कक्ष क्रमांक ०२५२५२५२२५७, जिल्हा शैलेश चिकित्सक डॉ. कांचन वानेरे ९८९०९०६६१७. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी, डॉ. स्मिता वाघमारे ९९८७२४०७५० डॉ. तबस्सुम काजी ७७२००६०५१९ डॉ भक्ती चौधरी ७७२००६०४७८ डॉ.अब्दुल चौधरी ९५७९४९२३४१ या संपर्क क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# मुंबई विद्यापीठाचे पालघरमध्ये उपकेंद्र

**वसई, दि.१६। प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठातील वाढती विद्यार्थीसंख्या आणि त्यामुळे प्रशासनाची होणारी अडचण ध्यानात घेऊन मुंबई विद्यापीठाने आणखी एक उपकेंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच पालघर जिल्ह्यात हे उपकेंद्र सुरू होणार आहे. रत्नागिरी, ठाण्यापाठोपाठ आता पालघरमध्ये उपकेंद्र सुरू झाल्यावर वसई विरारसह बोरिवली ते थेट तलासरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येईल. पालघरमध्ये उपकेंद्र सुरू झाल्यावर मुंबई विद्यापीठावरील ताण कमी होण्यास मदत होईल. पालघर जिल्ह्याच्या विभाजनानंतर जिल्ह्याचा हवा तसा विकास झालेला नाही. गाव आणि पाड्यांतील समस्या 'जैसे थे' आहेत. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात उचललेले हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या स्वतंत्र उपकेंद्राची तयारी आता अंतिम टप्प्यात असून शासनाने सहकार्य केल्यास येत्या जून महिन्यापासून नवीन उपकेंद्र सुरू करण्यास विद्यापीठ सज्ज असल्याचे सूत्रांनी सांगितले. या उपकेंद्रासाठी विद्यापीठाने दोन प्रस्ताव शासनाकडे पाठवले होते. पहिल्या प्रस्तावात १०० एकर जमिनीची मागणी पालघरमध्ये करण्यात आली आहे. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात जमीन संपादनासाठी वेळ लागणार असल्याने चार ते पाच एकर जमीन प्राथमिक स्वरूपात देण्याचा दुसरा प्रस्तावही देण्यात आला आहे. दोन्ही प्रस्ताव शासनदरबारी मंजुरीसाठी असून सरकारनेही हिरवा कंदील दिला आहे. यासाठी पालघरचे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे आणि मुंबई विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. दिनेश कांबळे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी बैठका घेऊन उपकेंद्रासाठी जागाही शोधल्या आहेत. निश्चित केलेल्या जागा शासन दरबारी विचाराधीन आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आसपासच्या परिसरात सध्या चार ते पाच एकर जागेवर सुरुवातीला प्रशासकीय कार्यालय सरू करण्याचा मुंबई विद्यापीठाचा विचार आहे. सध्या विद्यार्थ्यांना कालिना तसेच मुंबईला शैक्षणिक कामासाठी जावे लागते. यामुळे विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर वेळ खर्च होतो. पालघरमध्ये उपकेंद्र सुरू झाल्यावर येथे विद्यापीठाच्या सेवा मिळतील.

# श्री.रमाकांत शिंदे यांचा दुसऱ्यांदा महाराष्ट्र शासनाकडून गौरव

**पालघर, दि.१६। प्रतिनिधी**

ग्रामपंचायत मनोर येथे कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी यांना १२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण यांचे जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल श्री. कोश्यारी व मा. उद्धवजी ठाकरे (मुख्यमंत्री) आणि मा. अजितदादा पवार उपमुख्यमंत्री यांचे उपस्थितीत ग्रामविकास मंत्री श्री.यांचे हस्ते राज्यस्तरीय आदर्श ग्रामविकास अधिकारी पुरस्कार देवून सन्मानित केले. श्री रमाकांत शिंदे यांनी मनोरमध्ये त्यांचे कार्यालयात उत्कृष्ट व उल्लेखनिय कार्य केल्यामुळे मनोर ग्रामपंचायतीस एकत्र छोटे मोठे ११ पुरस्कार मिळवून देणेत मोठे योगदान आहे. त्यामध्ये यशवंत पंचायत राज अभियानात राज्यस्तरीय दोन वेळा व राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानात केंद्रपातळीवर दोन वेळा पुरस्कार मिळवून देणेत मोलाची कामगिरी बजावली आहे.तसचे मनोर गावाचा सर्वांगीण विकासात



कायमच सहकार्य केले आहे. त्यांच्या या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन सन १६-१७ मध्ये श्री रमाकांत शिंदे यांना राज्यस्तरीय गुणवंत अधिकारी म्हणून गौरवण्यात आले होते. त्यानंतरही त्यांचे कामाचा आलेख उंचावत राहिला व विविध अभियानात व योजनेत यशस्वी सहभाग घेऊन ग्रामपंचायतीस विविध बक्षिसे मिळवून दिली. यामध्ये हागणदारीमुक्त गाव, स्मार्ट ग्राम करणेस मोलाचे योगदान दिले. याकार्याची पुनश्च दखल घेऊन ग्रामसेवक संवर्गातील सर्वोच्च असा राज्यस्तरीय आदर्श ग्रामविकास अधिकारी म्हणून राज्यपालाचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री महोदयाच्या उपस्थित सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या या कार्यास मा. मुख्याधिकारी अधिकारी (पालघर), उपमुख्यकार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी तसेच ग्रामपंचायत मनोरचे सरपंच व सर्व सन्मा सभासद यांनी सहकार्य व मार्गदर्शन केले. श्री. रमाकांत शिंदे यांना संवर्गातील सर्वोच्च व दुसऱ्यांदा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल समाजातील सर्व स्तरावरुन त्यांचे कौतुक होत आहे.

## वाड्यात मोफत मास्क वाटप

**वाडा।** जनरल कामगार युनियन वाडा शाखेच्या वतीने कुडूस येथे नागरिकांना मोफत मास्कचे वाटप करण्यात आले. सध्या देशभरात करोना व्हायरस आजाराची मोठी दहशत निर्माण झाली असुन नागरीक भीतीच्या छायेखाली वावरत आहेत. याची दखल शासन स्तरावर घेतली जात आहे. परंतु आपणही आपल्या परीने देशहित डोळयासमोर ठेऊन काही वाटा सुरक्षिततेच्या दृष्टीने उचलणे कर्तव्य आहे. या विचाराने प्रेरित होऊन मोफत या मास्कचे वाटप करत असल्याचे युनियनचे अध्यक्ष रमेश भोईर यांनी सांगितले. या मोफत मास्क वाटपाचा लाभ स्थानिक नागरिकांना झाला असुन त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. या प्रसंगी युनियनचे सरचिटणीस सुरेश भोईर, रश्मी भोईर, दिलीप भानुशाली, पप्पु जाधव यांच्यासह पदाधिकारी व नागरीक उपस्थित होते.

# चिंचणीतील १४ पाडे पाणीपुरवठ्यायापासून वंचित

**पालघर, दि.१६। प्रतिनिधी**

डहाणू पंचायत समितीने (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) चिंचणी गावातील पाणीपुरवठा बंद केल्याने गेल्या सहा दिवसांपासून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. चिंचणी ग्रामपंचायतीची पाणी देयकाची एक कोटींची थकबाकी असल्याने पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.

चिंचणी येथे एकूण १४ पाडे असून ५००० कुटुंब आहेत. तर या ग्रामपंचायती अंतर्गत एकूण २,८१९ नळजोडणी आहे. डहाणू किनारपट्टीवरील चिंचणी गावास साखरा धरणातून जिल्हा परिषदेमार्फत पाणीपुरवठा केला जातो. परंतु येथील बहुसंख्य नळजोडणीधारक ग्रामपंचायतीला पाण्याची देयके भरत नसल्याने ग्रामपंचायत चिंचणीची एकूण एक कोटी थकबाकी झाली आहे. अनेक रहिवाशांची १५ हजार, २० हजार, ३० हजार अश थकबाकी आहे. अनेक वेळा ग्रामपंचायत प्रशासनाने ग्राहकांना सूचना व नोटिस दिल्या, तसेच कायदेशीर कारवाईही केली. मात्र तरीही प्रतिसाद मिळत नसल्याने गेल्या आठ दिवसांपासून ग्रामपंचायतीने प्रत्येक प्रभागात रिक्षा घेऊन थकबाकीधारकाचे नाव, रक्कम ध्वनिवर्धकाद्वारे जाहीर करत आहे. यापुढेही ग्राहकांची पाणीपुरवठा खंडित करण्याची कारवाई ग्रामपंचायत प्रशासन करणार असल्याचे ग्रामविकास अधिकारी निलेश जाधव यांनी सांगितले.

दरम्यान, भर उन्हाळ्यात गेल्या सहा सात दिवसांपासून पाणीपुरवठा बंद केल्याने अनेक रहिवाशांचे हाल झाले. चिंचणी गावातील अनेक प्रभागांत तर पिण्याच्या पाण्याची विहीर नसल्याने अनेकांना खासगी बोअरिंगवरून पिण्याचे पाणी आणावे लागते.

जे ग्रामस्थ प्रामाणिकपणे देयक भरतात, त्यांनाही पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. डहाणू पंचायत समितीकडून येणारे पाणी देयक चिंचणी ग्रामपंचायत भरू शकत नसल्याने ही कारवाई झाल्याचे बोलले जात आहे.

# पालघर तालुक्यातील आंब्याचा मोहर कोमेजला अनेक ठिकाणी तुडतुड्या रोगाचा प्रादुर्भाव

**पालघर, दि.१६। प्रतिनिधी**

लांबलेला पावसाळा व अवकाळी पाऊस याचा परिणाम आंब्याच्या बहरावर झाला असून पालघर तालुक्यातील अनेक ठिकाणी आंब्याचा मोहर कोमजले आणि करपल्याच्या तक्रारी बागायतदार करत आहेत. त्यामुळे यंदाच्या हंगामामध्ये आंब्याच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे.



पालघर तालुक्यात सुमारे ७१० हेक्टरवर आंबा लागवड असून तालुक्यातील ७० हजार आंब्याची झाडे आहेत. यंदाच्या हंगामामध्ये लांबलेला पावसाळा आणि त्यानंतर झालेल्या अवकाळी पावसामुळे आंब्याच्या मोहर येण्यास विलंब झाला आहे. सध्या आंब्याला मोहर आला असला तरी अनेक ठिकाणी हा मोहर करपण्याचे आणि कोमेजल्याचे दिसून येत असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आंब्याच्या मोहरावर तुडतुड्यांचा प्रादुर्भाव झाल्याने या मोहाराला काळसर रंग प्राप्त झाल्याचाही दिसून येत आहे.

आंबा मोहरावर तुडतुडे व करपण्याचा प्रकार अधिकतर हापूस आंब्यांवर अधिक प्रमाणात दिसून येत असून तुलनात्मक केसर व राजापुरी आंब्यांचा मोहरावर या किडीचा विशेष प्रादुर्भाव कमी प्रमाणात झाल्याचे दिसून येते. मात्र एकंदरीत आंब्याचा मोहर कमी प्रमाणात आल्याचे दिसून येत असल्याने यंदा आंबा उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व बागायतदारांकडून व्यक्त होत आहे.

### कृषी विभाग तपास करणार

यासंदर्भात तालुका कृषी अधिकारी तरुणी वैती यांच्याशी संपर्क साधला असता आंब्याच्या मोहरावर परिणाम झाल्याच्या तक्रारी आजवर आपल्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्या नसल्याचे सांगितले. तसेच या संदर्भात तालुक्यात ठिकठिकाणी चौकशी करून अहवाल वरिष्ठांकडे पाठवण्यात येईल, असे ते म्हणाले.

# संजना आंगचेकर झाल्या शिवसेनेच्या सुगरण

**वसई, दि.१६। प्रतिनिधी**

शिवसेना नालासोपारा शहर अमीपार्क-पांचाळनगर शाखेने आयोजित केलेल्या कला-क्रीडा महोत्सवातील पाककला स्पर्धेत आपल्या हाताची चव दाखवत संजना आंगचेकर यांनी सुग्रणीचा किताब पटकावला.

सुमारे महिनाभर चाललेल्या या महोत्सवात कॅरम,होम मिनीस्टर,चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच वोक्हार्ड हॉस्पीटलतर्फे आरोग्य शिबीरही घेण्यात आले.६६५ जणांना या शिबारीचा लाभ घेतला.यावेळी मोफत रक्त तपासणीही करण्यात आली.तालुका प्रमुख प्रवीण म्हाप्रळकर,शहरप्रमुख संतोष टेंबवलकर,उपशहरप्रमुख मोतीराम धावडे यांनी या शिबीराचे आयोजन केले होते. विभागप्रमुख श्रीकांत सणस,विभाग संघटक,अंकिता आरौदेकर,उपविभाग संघटक रेखा मोंडे,शाखाप्रमुख कृष्णा सावंत यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी या महोत्सवासाठी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान,अत्यंत चुरशीच्या झालेल्या पाककला स्पर्धेत दुसरा क्रमांक रुक्साना पठाण आणि तिसरा क्र.प्राजक्ता पार्टे यांनी पटकावला.तर होम मिनीस्टरची पैठणी मनीषा मयेकर यांनी पटकावली,दुसरा क्रमांक रुपाली वरे आणि तिसरा क्रमांक सरोज देसाई यांनी पटकावला.


## जिल्हा परिषद पालघर
## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**जा.क्र.पाजिप/पापुवि/निविदा/३४१/२०२०** **दिनांक : १६-०३-२०२०**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्यावतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचेकडील जिल्हा परिषद देखबाल दुरुस्ती अतर्गत मौजे वाकी कुवारीपाडा तालुका डहाणू येथे सौर उर्जेवर लघु नळ पाणी पुरवठा करणे कामाची निविदा ONLINE द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदरची निविदा दिनांक १७-०३-२०२० रोजी दुपारी १२.०० वाजल्यापासून दिनांक ३१-०३-२०२० रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत Download करता येतील.

यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तींमध्ये बदल करणे, प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(रविंद्र दुधे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद पालघर



MRVL
MANDHANA RETAIL VENTURES LTD.

## दि मंधाना रिटेल व्हेंचरस् लिमिटेड

**सीआयएन : एल५२३९०एमएच२०११पीएलसी२१३३४९**
**नोंदणीकृत कार्यालय:** प्लॉट नं. ई १३२, एम.आय.डी.सी., तारापूर इंडस्ट्रियल एरिया, बोईसर, जिल्हा- पालघर - ४०१५०६
**कॉर्पोरेट कार्यालय:** ००६-००८, पेनिनसुला सेंटर, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई - ४०००१२
**फोन नं.** ०२२ ४३५३९७९७ • **ई-मेल:** cs@tmrvl.com • **वेबसाईट:** www.mandhanaretail.com

## टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांसंबंधीची सूचना

सभासदांना याद्वारे सूचना देण्यात येते की, दि मंधाना रिटेल व्हेंचर्स लिमिटेड ('कंपनी') आणि बिईंग ह्यूमन – द सलमान खान फाऊंडेशन यांच्यामध्ये ट्रेडमार्कशी संबंधित निवडक इनव्हेंटरिज् आणि स्टोअर असेट्सची विक्री फोर एसेस फॅशन हाऊस प्रायव्हेट लिमिटेड यांना करण्यासाठीच्या विशेष ठरावाला सभासदांची मान्यता, इलेक्ट्रॉनिक माध्यमासह (ई–व्होटिंग) टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांद्वारे मिळविण्यासाठी कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') च्या कलम ११० व त्यासोबत कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २२ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('लिस्टिंग रेग्युलेशन्स') मधील विनियम ४४ यांच्या – त्यांत सध्या झालेल्या कोणत्याही वैधानिक सुधारण किंवा पुन्हा केलेले कायदे यांच्यासह सहवाचनांतर्गत, कंपनीने, टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांसह टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांसंबंधीची सूचना, ज्या सभासदांने ईमेल आयडीज् डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे किंवा कंपनी निबंधक व भाग हस्तांतरण अभिकर्ता यांच्याकडे नोंदवलेले आहेत त्यांना ईमेलद्वारे आणि इतर सभासदांना प्रत्यक्ष रूपात, टपाल हशील आधीच भरलेल्या स्वत:चा पत्ता लिहिलेल्या बिझिनेस रिप्लाय एनव्हलपसहित, त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर मान्यताप्राप्त माध्यमातून पाठविण्याचे काम दिनांक १६ मार्च २०२० रोजी पूर्ण केलेले आहे.

टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकेच्या प्रपत्रासहित टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांसंबंधीची सूचना, ज्या सभासदांची नावे, नॅशनल सेक्युरिटिज् डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) यांच्याकडून शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२० रोजी (अंतिम तारखेपर्यंत) सभासदांच्या नोंदवहीत/लाभार्थी मालकांच्या यादीत समाविष्ट असतील. त्याचप्रमाणे, अंतिम तारखेपर्यंत ज्या सभासदांची नावे समाविष्ट असतील, त्यांचा विचार मतदानासाठी करण्यात येईल आणि सदर तारखेस जे कोणी सभासद झालेले नसतील, तर त्यांनी टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांसंबंधीची ही सूचना फक्त माहितीसाठी आहे, असे समजावे.

कंपनी कायदा, २०१३च्या कलम १०८ आणि ११० मधील तरतुदींच्या व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांच्या, तसेच सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील विनियम ४४ च्या अनुपालनाच्या दृष्टीने, कंपनीने आपल्या सभासदांना टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांमध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या ठरावावर त्यांचा मतदानाचा हक्क इलेक्ट्रॉनिक माध्यमातून बजावण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांकरिता ई–व्होटिंगसाठी कंपनीनने सीडीएसएलची नियुक्ती अभिकरण म्हणून केलेली आहे. टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांच्या माध्यमातून आणि ई–व्होटिंगच्या माध्यमातून अशा दोन्ही प्रकारचे मतदान बुधवार, दिनांक १८ मार्च २०२० रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होऊन गुरुवार, दिनांक १६ एप्रिल २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजता संपेल.

जे सभासद प्रत्यक्ष रूपातील/डीमॅट रूपातील भाग धारण करीत असतील, ते त्यांचा मतदानाचा हक्क प्रत्यक्ष रूपातील मतपत्रिकेच्या किंवा ई–व्होटिंगच्या माध्यमातून बजावण्याच्या पर्यायाची निवड करू शकतील. ई–व्होटिंगची तपशीलवार प्रक्रिया सभासदांना पाठविण्यात आलेल्या सूचनेत दिलेली आहे.

टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांच्या माध्यमातून मतदान करण्यासाठी इच्छुक असलेल्या सभसादांनी टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकेच्या प्रपत्रावर छापलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात, त्यात त्यांचा होकार किंवा नकार नोंदवावा आणि सदर प्रपत्र योग्य रितीने पूर्ण करून, कंपनीचा पत्ता लिहिलेल्या, टपालशुल्क आधीच भरलेल्या लिफाफ्यामध्ये, अशा रितीने पाठवावे की, ते छाननीकारांकडे गुरुवार, दिनांक १६ एप्रिल २०२० रोजी कामकाज संपण्यापूर्वी किंवा तोपर्यंत म्हणजेच सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचेल अशा बेताने पाठवावे अशी विनंती त्यांना करण्यात येत आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांचा विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे, ई–व्होटिंगचा हक्क गुरुवार, दिनांक १६ एप्रिल २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंतच बजावता येईल. त्यानंतर सीडीएसएल यांच्याद्वारे ई–व्होटिंग मॉड्यूल निष्क्रिय करण्यात येईल. टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांचे (ई–व्होटिंगसहित) निकाल शनिवारी/शनिवार, दिनांक १८ एप्रिल २०२० नंतर कामकाजाची वेळ संपताना किंवा त्यापूर्वी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात/कॉर्पोरेट कार्यालयात जाहीर केले जातील आणि ते कंपनीच्या संकेतस्थळावर, म्हणजेच www.mandhanaretail.com वर, सीडीएसएलच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.evotingindia.com वर प्रदर्शित केले जातील आणि ज्या स्टॉक एक्सचेंजेसवर कंपनीचे भाग सूचीकृत करण्यात आलेले आहेत, त्यांना कळविण्यात येतील.

ज्या सभासदांना टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकेच्या प्रपत्राची नक्कल प्रत हवी असेल, ते कंपनीच्या वर उल्लेख केलेल्या कॉर्पोरेट कार्यालयाकडून प्राप्त करू शकतील किंवा त्याच्या/तिच्या/त्यांच्या फोलिओ क्रमांकाचा किंवा डीपी आयडीचा आणि क्लाएंट आयडी क्रमांकाचा उल्लेख करून cs@mandhanaretail.com वर ई–मेलने कळवू शकतात. टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांसंबंधीची सूचना आणि टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकेचे प्रपत्र कंपनीच्या www.mandhanaretail.com ह्या संकेतस्थळावर आणि सीडीएसएलच्या www.evotingindia.com ह्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

टपालाद्वारे पाठवावयाच्या मतपत्रिकांशी संबंधित कोणत्याही शंका/तक्रारी वर उल्लेख केलेल्या कंपनीच्या कॉर्पोरेट कार्यालयाच्या पत्त्यावर कंपनी सचिवांकडे किंवा cs@mandhanaretail.com वर ई–मेल पाठवून कळविता येतील. ई–व्होटिंगशी संबंधित शंका/तक्रारी असल्यास सभासद www.evotingindia.com वर उपलब्ध असलेल्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज्) आणि ई–व्होटिंग मॅन्युअल यांचा संदर्भ घेऊ शकतील किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ई–मेल लिहू शकतील किंवा सीडीएसएलशी १८००२००५५३३ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधू शकतील किंवा श्री. राकेश दळवी, व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचुरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड, एन.एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई – ४०० ०१३ यांच्याशी helpdesk.evoting@cdslindia.com ह्या विशिष्ट ई–मेल आयडीवर संपर्क साधू शकतील.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**दि मंधाना रिटेल व्हेंचरस् लिमिटेड** करीता
**सही /-**
**संगिता मंधाना**
**(व्यवस्थापकीय संचालक)**
**डीआयएन : ०६१३४९७२**

**स्थान : मुंबई**
**दिनांक : १६ मार्च २०२०**